मुख्य कार्यालय विरार
यशवंत नगर, विरार (प.)
ता.वसई, जि. पालघर - ४०१ ३०३

दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र.वविशम/नर/शा/१३२३/२०२४-२५
दिनांक : ०४/०३/२०२५

**प्रेस नोट**

**वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामधील मौजे-आचोळे येथील क्षेपणभूमी Dumping Ground (DG-Site No.४५१) Sewage Treatment Plant (STP-Site No.४५०) मध्ये फेरबदल करणेबाबत व मौजे गास, दिवाणमान, चुळणे गिरीज व आचोळे येथील मिठागर (Salt Pan) या शासकीय जागेमधील प्रस्तावित विकास क्षेत्रामध्ये बदल करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वयेचा प्रस्ताव रद्द करणेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती डी, मौजे आचोळे सर्वे न.२२ ते ३२ व ८३ हे भूखंड क्षेपणभूमी व मलनि:सारण केंद्र या प्रयोजनासाठी मंजूर विकास आराखडयानुसार आरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. मा. विद्यमान खासदार, डॉ. हेमंत सावरा यांनी दि.०३/१२/२०२४ रोजीचे पत्र व मा. विद्यमान आमदार, श्री. राजन नाईक यांनी दि.०२/१२/२०२४ रोजीचे पत्रान्वये मलनि:सारण केंद्राच्या आरक्षण क्षेत्रावरील ४१ इमारती वाचवायच्या असतील तर सदर आरक्षणाचे फेरबदल प्रस्तावित करणे आवश्यक आहे, असे चर्चेअंती निश्चित झाले. त्या फेरबदलात क्षेपणभूमीचे आरक्षण बहुतांशी मोकळया जागेवर होते ते मात्र कायम ठेवण्यात आले आहे व त्यानुसार महानगरपालिकेने प्रारुप अधिसूचना शासन राजपत्रात दि.२३ ते २९ जानेवारी २०२५ रोजी प्रसिध्द केली होती.

तसेच नालासोपारा पुर्व येथे अमृत २.० योजनेअंतर्गत १०३ MLD चे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे व उपरोक्त फेरबदलांची माहितीसह इतर शैक्षणिक अडचणी हया बाधित नागरीकांनी न्यायालयाच्या निर्दशनास आणणे आवश्यक होते. परंतू सदर प्रकरणी या मुद्दयांसह इतर अडचणीच्या अनुषंगाने बाधित नागरीकांनी न्यायालयासमोर सदरची बाब निर्दशनास आणली नाही व मा. उच्च न्यायालयाचे आदेश कायम राहीले तसेच त्या आदेशांना मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील कायम केले हि वस्तूस्थिती असल्याने या ४१ इमारती पाडण्याशिवाय महानगरपालिकेसमोर पर्याय नव्हता.

नालासोपारा (प.) येथे सन २००७ च्या विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र.४०२ हे मलनि:सारण केंद्राकरीता आरक्षित आहे. भविष्यात सन २०४१ पावेतो शहराची लोकसंख्या ५० लक्ष च्या पुढे जाण्याचा अंदाज असल्याने शासकीय जागेतील १०००० चौ.मी. ही या मलनि:सारण केंद्राच्या आरक्षणा शेजारील जागेचा फेरबदल देखील करण्यात आला होता व शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता घनकचरा साठवणूक, विल्हेवाट लावणेसाठी नविन क्षेत्र निश्चित करण्यात आले होते.

सदर प्रारुप अधिसूचनेची दै. सकाळ, दै.पुण्यनगरी, दै.वृत्तमानस, दै.मुंबई चौफेर, दै.महासागर, दै.आमची मुंबई, दै.पुढारी, दै.आपला महानगर, दै.प्रहार, दै.नवराष्ट्र, दै.जागल्या, दै.चौफेर संघर्ष या १२ वृत्तपत्रात दि.३१/०१/२०२५ रोजी प्रसिध्दी करण्यात आली होती व त्यानुसार दि.३१/०१/२०२५ ते ०३/०३/२०२५ या कालावधीत हरकती/सुचना मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन नागरीकांकडून एकूण २५०० एवढया मोठया संख्येने हरकती /सूचना प्राप्त झाल्या आहेत. नागरीकांनी दाखल केलेल्या हरकती/सूचना अन्वये क्षेपणभूमी व मलनि:सारण केंद्र सन २००७ चे विकास आराखडयातील आरक्षण क्र.४०२ चे लगतचे क्षेत्र जे नव्याने मलनि:सारण केंद्राकरीता वाढीव क्षेत्र निश्चित केले होते ते वगळण्याबाबतची मागणी होती. याच मुद्दयाला अनुसरुन १३२-नालासोपारा विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. राजन नाईक व १३३-वसई विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीम. स्नेहा दुबे पंडीत यांनी देखील सदर प्रारुप अधिसूचना रद्द करणेची मागणी महानगरपालिकेकडे नोंदवली आहे. नागरीकांच्या हरकती व आमदार महोदयांचे लेखी पत्रव्यवहारानूसार सदरची मौजे-गास येथील क्षेपणभूमी व २००७ चे विकास आराखडयामधील मलनि:सारण केंद्राचे आरक्षण क्र.४०२ जवळील वाढीव क्षेत्राची अधिसूचना रद्द करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. महानगरपालिकेने सन २००७ च्या मंजूर विकास आराखडयामधील मौजे-आचोळे येथील सर्वे न.२२ ते ३२ व ८३ या भूखंडावरील आरक्षण क्षेपणभूमी व मलनि:सारण केंद्र या प्रयोजनासाठी कायम ठेवण्यात आले आहे.

YEMMIGANURSIVA YEMMIGANURGOPAL
Digitally signed by YEMMIGANURSIVA YEMMIGANURGOPAL
Date: 2025.03.04 19:53:55 +05'30'

**उपसंचालक नगररचना**
**वसई विरार शहर महानगरपालिका**